INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# ओबीसी हक्क संरक्षणाचे उपाय एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप
## (A Historic Review of OBC Rights Protection Measures)

**डॉ. बालाजी पी. मुंडे**
सहयोगी प्राध्यापक,
जालना समाजकार्य महाविद्यालय, जालना

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2022-49817774/IRJHIS2207010

**प्रस्तावना:**

भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकाच्या दरम्यान भारत अनेक ब्राह्मणवाद विरोधी राजकीय-सामाजिक आंदोलनांचा साक्षी राहिला आहे. दक्षिण आणि पश्चिम भारतातून पेटलेल्या या आंदोलनांनी ब्राम्हणांच्या वर्चस्वावर प्रश्न उपस्थित केले आणि शिक्षण, रोजगार आणि राजकीय सत्तास्थानांवर वंचित घटकांसाठी समान संधींची मागणी केली गेली. महात्मा ज्योतिराव फुले (१८२८-१८९०), राजर्षी शाहू महाराज (१८७४-१९२२), ई.व्ही. रामास्वामी पेरियार (१८७९-१९७३), डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१८९१-१९५६) यांच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनांनी आत्मसन्मान प्राप्त करण्यासाठी आणि समताधीष्टीत समाज निर्माण करण्यासाठी दिलेल्या लढ्यावर आपले नाव कोरले आहे.

**संशोधनाचे उद्देश :**

१) ओबीसींच्या हक्क संरक्षणासाठी झालेले वैयक्तिक व सांघिक प्रयत्न समजून घेणे.
२) ओबीसींच्या हक्क संरक्षणासाठी घटनात्मक तरतुदी विषयक प्रयत्नांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :**

सदरील संशोधन हे पूर्णतः सैद्धांतिक स्वरूपाचे संशोधन असून या संशोधनामध्ये मांडण्यात आलेली तथ्ये ही द्वितीयक तथ्यांचा आधार घेऊन मांडण्यात आलेली आहेत. संशोधन विषयासंबंधी विविध प्रकारची संदर्भ पुस्तके, नियतकालिके, विविध शासकीय अहवाल, सर्वेक्षण अहवाल तसेच अभ्यास अहवाल व दैनिकातील इत्यंभूत माहितीचा वापर करण्यात आला आहे.

- मद्रासच्या दक्षिण भारतीय जन संघटनेने आकडेवारी आणि तथ्यांच्या आधारावर विस्तृतपणे हे सांगितले की ३% पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ब्राह्मणांनी शिक्षण रोजगार आणि राजकीय सत्तास्थानांवर ८५% ते ९४% पर्यंत एकाधिकार प्राप्त केला आहे. या आधारावरच दक्षिण भारतीय जनसंघघटनेने १९१६ च्या आपल्या ब्राह्मणेतर अंदोलानाच्या घोषणापत्रामधे भारतीयांना प्रदान केले जाणाऱ्या 'होम रुल' किंवा 'स्वराज्या' बाबत शंका व्यक्त केली. ब्राह्मनेतरांसाठी स्व-शासन (स्वराज्य) चा अर्थ 'ब्राह्मणांचे शासन' असा होता. ज्यामध्ये ब्राह्मनेतरांची स्थिती निश्चितच बिघडणार होती. डिसेंबर १९१७ मध्ये मद्रास मधे

झालेल्या ब्राह्मणेतरांच्या संमेलनामध्ये प्रस्तावित स्वराज्यामधे ब्राह्मनेतरांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सामुदायिक आरक्षणाच्या मागणीचा प्रस्ताव सर्वसंमतीने पारित झाला. सन १९१९ मध्ये गव्हर्णमेंट ऑफ इंडिया ॲक्ट पास झाल्यानंतर मद्रास विधानसभेत मुसलमानेतरांसाठी उपलब्ध ६५ सामान्य जागांमधुन ब्राह्मनेतरांसाठी आरक्षित २४ जागांवर जस्टीस पार्टीला यश मिळाले.

- महात्मा फुले यांनी आपल्या लेखणामधुन पंचायती, सार्वजनिक सेवा आणि संस्थांमधे हिंदूंच्या सर्व वर्गांना प्रतिनिधित्व देण्याची मागणी केली, जेणेकरून ब्राह्मणांचे वर्चस्व समाप्त करता येईल. 'माँटेग्यू आणि चेम्सफोर्ड' यांच्या राजकीय सुधारणांच्या घोषनेच्या वेळी कोल्हापूरचे शाहू महाराज म्हणाले की "जर जाती जशाला तशाच राहिल्या तर स्वराज्य म्हणजे घराणेशाहीचे स्वराज्य होऊन बसेल". स्वराज्याला घराणेशाहीपासून रोखण्यासाठी मागास घटकांना किमान दहा वर्ष आरक्षणाच्या माध्यमातून सामुदायिक प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. त्यामुळे आपल्यात आपल्या हक्कांबाबत जागृती निर्माण होईल. एकदा आपण आपल्या हक्कांबाबत जागृत झालो की त्यानंतर आपण आपले सामुदायिक प्रतिनिधीत्व परत मिळवु शकतो. शाहू महाराज हे असे राजा होते की ज्यांनी मागास हक्क आंदोलनामध्ये एवढी ऊर्जा लावली की मोंटेग्यू आणि चेम्सफोर्ड यांना आपल्या भारतीय राजकीय सुधारणांमध्ये त्यांची ही मागणी मान्य करावी लागली.
- स्वातंत्र्य आंदोलनाची सुरुवात झाल्यानंतरही भारतातील मुस्लिमांच्या समानुपातिक प्रतिनिधित्वाच्या मागणीला निष्प्रभ करण्यात काँग्रेस पूर्णपणे अयशस्वी ठरली. या घटनेने ब्राह्मणेतरांच्या आशा पल्लवित झाल्या. मतदारसंघांची मुसलमान आणि मुसलमानेतर क्षेत्रांमधे विभागणी करण्यात आली आणि काँग्रेसने त्याला मान्य केले. इतिहासात या घटनेला प्रसिद्ध 'लखनौ करार' म्हणून ओळखले जाते. मुसलमानांना १९१९ मधेच वेगळे मतदारसंघ मिळाले. १९३२ च्या पुणे करारामुळे पूर्वीचे अस्पृश्य (एससी) यांना समानुपातिक स्वरूपात विधानमंडळात वाटा मिळाला जो आजपर्यंतही मिळत आहे.
- स्वातंत्र्यापूर्वी भारतात राजकीय संधींसाठी शुद्रांकडून केल्या गेलेल्या मोठ्या संघर्षानंतरही आणि भारतात सर्व नागरिकांना राज्यघटनेच्या माध्यमातून राजकीय न्यायाच्या घटनात्मक गॅरंटी नंतरही येथील मागास घटक हजारो वर्षापासून जातीय दुर्बलता, पराधीनता आणि शोषणामध्ये भरडत राहिले आणि त्यामुळेच ते आक्रमक असनाऱ्या सवर्णांशी स्पर्धा करू शकत नाहीत हे सर्वश्रुत सत्य असतानाही घटनासभेला ओबीसींना राजकीय प्रतिनिधित्व देण्याची गरज वाटली नाही. ११ नोव्हेंबर १९१७ रोजी अथानी येथे भाषण देताना टिळकांनी 'बॉम्बे प्रेसिडेन्सी' च्या विधिमंडळात विविध मागास समुहांच्या प्रतिनिधित्वासंदर्भात मत व्यक्त करताना कुंभार जातींच्या विरोधात अतिशय कठोर शब्दप्रयोग केला. टिळकांनी असे उपहासात्मक प्रश्न विचारले की विधिमंडळात जावून कुंभार मडकी घडवीणार आहेत का ? शिवणकाम करणारे शिंपी लोक काय विधिमंडळात शिवणयंत्र चालवणार आहेत का ? शेतकरी विधिमंडळात शेती करणार आहेत का ? १९१८ मधे सुद्धा जेव्हा ब्राह्मणेतर आणि मागासवर्गाच्या लोकांनी विधानमंडळात वेगळया प्रतीनिधित्वासाठी आंदोलन करणे सुरू केले तेव्हा टिळक सोलापूरच्या एका सभेत म्हणाले की तेली, तांबोळी, धोबी अर्थात ब्राह्मणेतर आणि मागास घटकांचे विधिमंडळात काय काम ? त्यांचा मतितार्थ असा की त्यांचे काम फक्त नियमांचे पालन करणे हेच आहे पण हे नियम बनवण्याची शक्ती प्राप्त करण्याचे त्यांनी प्रयत्न करायला नको ?

- १० ऑक्टोबर १९५१ रोजी नेहरूंच्या मंत्रिमंडळातून आपला राजीनामा सादर करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इतर मागासवर्गीयांसाठी त्यांच्या हितांच्या घटनात्मक संरक्षणाचे कारण दिले. त्यावेळी त्यांनी व्यक्त केलेले मत पुढील प्रमाणे होते... "मला अत्यंत दुःख होत आहे की, इतर मागासवर्गीयांच्या संरक्षणासाठी राज्यघटनेने कोणतेही प्रावधान केलेले नसून त्याला भविष्यात राष्ट्रपतींनी नियुक्त केलेल्या आयोगाच्या शिफारशींच्या आधारावर सरकारने तरतुदी करण्यासाठी सोडून देण्यात आले आहे".
- राज्यघटनेतील सध्याचे कलम ३३५ अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या नोकऱ्या आणि नियुक्त्या संदर्भात असे म्हणते की केंद्र आणि राज्याच्या नोकऱ्या आणि नियुक्त्यांमध्ये प्रशासनाची कुशलता कायम राखून, अनुसुचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या दाव्यांना विचारात घेतले जाईल. फक्त अल्पसंख्यांकांच्या हितासाठी तयार केलेल्या कलमाचे स्वरूप जसे होते तसेच या कलमाचे सुरुवातीचे आणि वास्तविक स्वरूप होते. परंतु भारताच्या फाळणीनंतर बदललेल्या परिस्थितीमधे मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. आंबेडकर यांनी संविधान सभेतील निर्णायक शक्तींना सोबत घेउन संमतीने एसटी आणि एससी साठी कलम २९६ च्या मूळ कलमात घटनादुरुस्ती केली. या संदर्भात संविधान सभेचे सदस्य गुप्तनाथ सिंह यांनी के एम मुंशींच्या कलम २९६ च्या मसुद्यात 'इतर मागास वर्गाला' समाविष्ट करण्याची विनंती केली. परंतु कलम २९६ च्या मसुद्यामधे 'इतर मागास वर्गाला' स्थान मिळाले नाही. आजचे कलम ३३५ (जे कलम २९६ सारखेच आहे) कलम १६(४) शी थेट जोडलेले आहे. जे राज्याच्या दृष्टिकोनातून योग्य वाटा न मिळालेल्या इतर मागास वर्गाच्या लोकांना नियुक्त्यांमधे आरक्षण देण्यासाठी राज्याला आधिकार प्रदान करते. कलम १६(४) च्या शब्दरचनेचा अर्थ आहे की एसटी, एससी आणि ओबीसी यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भेद केलेला नाही परंतु कलम ३३५ एसटी आणि एससी यांना विशिष्ट श्रेणी बहाल करते आणि त्यांना काही अधिकारही प्रदान करते जे त्या कलमातून बाहेर काढण्यात आलेल्या ओबीसींना मिळत नाहीत. या दोन्ही कलमांमध्ये एक प्रकारची विसंगती आणि संभ्रम आहे ज्याचा परिणाम म्हणून ओबीसींसोबत अनुचित आणि मोठा भेदभाव झाला आहे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनादुरुस्तीच्या माध्यमातून बदललेल्या कलम २९६ च्या मसुद्याला जेव्हा घटनासभेत चर्चेसाठी घेण्यात आले तेव्हा डॉ. पी. एस. देशमुख आणि गुप्तनाथ सिंह यांनी एसटी, एससी सोबतच 'इतर मागास वर्गालाही' या कलमात समाविष्ट करण्याची निरंतर विनंती केली. मुंशी आणि डॉ. आंबेडकर यांनी अगोदरच गुप्तनाथ सिंह यांना याबाबत शब्द दिला होता. परंतु पं. ठाकुरदास भार्गव आणि आर. के. सिंधवा यासारख्या सवर्ण सदस्यांनी इतर मागास वर्गाला या कलमात समाविष्ट करण्यास एवढा टोकाचा विरोध केला की 'इतर मागास वर्ग' हा शब्दप्रयोगच आम्ही राज्यघटनेत नमूद करू इच्छित नाही असा त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आणि यावर डॉ. आंबेडकर आणि के. एम. मुंशी कांहीच बोलू शकले नाहीत. गुप्तनाथ सिंह यांच्या मतानुसार संविधान सभेत ओबिसींचे पर्याप्त आणि सक्षम प्रतिनिधित्व नसल्याने (टेबल क्र. १ मधे पाहू शकता) संविधान सभेत डॉ.आंबेडकरांसारखा ओबीसींचा सक्षम प्रवक्ता/प्रतिनिधि नसल्याने या युक्तीवादामधे ओबिसींना बरेच कांही गमवावे लागले.
- कलम १६(४) सोबतच कलम ३३५ वाचल्यानंतर त्याचे महत्त्व लक्षात येते. जर कलम ३३५ मधे ओबीसीला समाविष्ट केले असते तर १९९२ पर्यंत भारत सरकार ओबीसींचा नोकऱ्यांतील आरक्षणाचा वाटा

तब्बल ४३ वर्ष टाळू शकले नसते. अत: कोणत्याही कारणाने असो परंतु ओबीसींच्या सक्षमीकरणा संबंधी संरक्षणात्मक उपायांना आपल्या राज्यघटनेत समाविष्ट केले नाही. २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अंगीकृत केल्याच्या घोषणेच्या दिवशीच ओबीसींवरील या अन्यायाच्या विरोधात 'अखिल भारतीय मागासवर्ग महासंघाची' स्थापना झाली.

- २७ सप्टेंबर १९५१ ला नेहरू मंत्रिमंडळाचा राजीनामा दिल्यानंतर त्याच्या कारणांचा खुलासा करताना 'अनुसूचित जातींच्या' हिताच्या संरक्षणासाठी आपली बांधिलकी न्यायसंगत असल्याचे सांगत तसेच त्यांच्यासाठी निर्धारित आरक्षण लागु करण्यात सरकार अपयशी ठरल्याबाबत प्रश्न उपस्थित करताना १० ऑक्टोबर १९५१ रोजी केलेल्या आपल्या वक्तव्यामधे डॉ. बी. आर. आंबेडकर म्हणाले की "सरकार कडून अनुसूचित जाती (SC) ची केली जात असलेल्या उपेक्षेवरील माझी नाराजी मी लपवू शकत नाही आणि अनुसूचित जातींच्या एका सार्वजनिक सभेत ती मी व्यक्तही केली". "मी माझे जीवन अनुसूचित जातीं (SC) च्या उद्धारासाठी समर्पित केलेले आहे" त्यामुळे आपल्याला चार पावले पुढे जायचे असेल तर दोन पाउल मागे यावे लागते या उक्ती प्रमाणे मी ओबीसींच्या विषयाबाबत भूमिका घेतली आहे. आपल्या या वक्तव्यात एका बाजूला मुसलमानांच्या संरक्षणासाठी सरकारची गंभीरता आणि दुसऱ्या बाजूला अनुसूचित जातींच्या संरक्षणासंबंधी तरतुदींना लागू करण्यातील सरकारची उदासीनता यांची तुलना करताना याबाबत प्रश्न उपस्थित करत डॉ. आंबेडकर म्हणाले की "पंतप्रधानांचे पूर्ण लक्ष आणि वेळ फक्त मुसलमानांच्या संरक्षणासाठी समर्पित आहे. जेव्हा कधी आणि जिथे कुठे भारतातील मुसलमानांना गरज असेल त्यांच्या हितांच्या संरक्षणाला कोणाच्याही भरोशावर मी सोडणार नाही (पंतप्रधानांच्याही नाही) परंतु मला हे जाणुन घ्यायचे आहे की भारतात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि भारतातील ख्रिश्चन यांच्या हितांच्या संरक्षणाची काहीच गरज नाही का ?
- हे सत्य आहे आणि यामधे कसलीही शंका नाही की जातीव्यवस्थेचे सर्वात मोठे बळी आणि पीडित हे एससी (अस्पृश्य) हेच होते. त्यांना योग्य लोकशाहीयुक्त हक्क मिळाले पाहिजेत परंतु हेही तेवढेच सत्य आहे की प्रस्थापीत व्यवस्थेत फक्त एससी (अस्पृश्य)च पीडित राहिलेले नाहीत तर जातिव्यवस्थेने पीडीत असलेला सर्वात मोठा समूह 'ओबीसीही आहे, जो देशातील लोकसंख्येच्या जवळपास अर्धा भाग आहे. त्याचबरोबर हेही सत्य आहे की ओबीसींच्या विवंचनांचे प्रमाण एससी (अस्पृश्य) श्रेणीच्या तुलनेत कमी राहिले आहे. परंतू मुळ प्रश्न हा निर्माण होतो की फक्त एसटी आणि एससी यांनाच तात्काळ आणि ठोस घटनात्मक संरक्षणाची गरज होती आणि ओबीसींना त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरणासाठी घटनानात्मक संरक्षण/ उपायांची गरज नव्हती का ? त्यामुळे असे म्हणन्यास वाव आहे की संविधान सभेतील दिग्गजांनी ओबीसींना आपली ओळख देणारी घटनात्मक परिभाषा/व्याख्या करण्याची जबाबदारी पार पाडण्याऐवजी 'इतर मागास वर्गाला' कलम ३४० अंतर्गत भारताच्या राष्ट्रपती द्वारा नियुक्त आयोगाच्या माध्यमातून परिभाषित करण्यासाठी अनिश्चित काळासाठी पुढे ढकलून दिले.
- फक्त एसटी आणि एससी यांना संपूर्ण लोकतांत्रिक अधिकार देऊन आणि जातिव्यवस्थेने पिडीत, देशातील सर्वात जास्त लोकसंखेला (तो ओबीसी जो देशातील आर्धी लोकसंख्या आहे आणि जो सवर्णांशी स्पर्धा करण्यासाठी आणि लोकशाही अधिकारांना स्वतःहून प्राप्त करण्यासाठी सक्षम नाही) ओबीसीला त्यांच्या गरजेनुसार असेच लोकतांत्रिक आधिकार देण्यासाठी राज्यघटनेत कोणतीही ठोस तरतूद न करता जातींचा

विनाश आणि समताधिष्ठित समाज निर्माण होणे कसे शक्य आहे ? समता प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेतील असमानतेच्या कारणामुळेच ओबीसींचे उत्थान होण्याऐवजी त्यांना खाली ढकलण्यात आले.

**सारांश :**

ओबीसींच्या पुढे पहिला संभ्रम हा आहे की 'इतर मागासवर्गा' मधे येणाऱ्या जातींच्या ओळखीसाठी कार्यात्मक परिभाषा तयार करण्याच्या प्रक्रियेत राज्यघटना सभेने ओबीसींबाबत एवढा सापत्नभाव का ठेवला ? तर दुसरा संभ्रम असा आहे की कलम २९६ च्या मसुद्यामध्ये ओबीसींना समाविष्ट का केले नाही ? याशिवाय या देशात मागास घटकांची संख्या बहुतांश असताना संपूर्ण आरक्षण फक्त कांही मर्यादीत जागांपुरतेच मर्यादीत असावे या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या युक्तिवादाला कसे समजून घ्यावे ? या त्यांच्या भूमिकेने ओबीसींच्या हिताच्या बदल्यात सवर्णांच्या लोकशाहीविरोधी हितांचे संरक्षण तर होत नाही ना ? जर अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित होणारे आणि मनमानी सिद्धांतांच्या आधारावर संतुलन तयार केले तर तीनही आरक्षित वर्ग एसटी, एससी आणि ओबीसी यांना आरक्षणाच्या प्रमाणाचे वाटप त्यांच्या लोकसंख्येच्या आणि प्रतिनिधीत्वाच्या कमतरतेपेक्षा जास्त तार्किक आणि वैज्ञानिक आधारावर होईल का ? ज्यामधे एसटी आणि एससी यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात, प्रस्थापित सवर्णांना लोकसंख्येपेक्षा किती तरी पटीने जास्त आणि ओबीसींना लोकसंखेच्या तुलनेत अत्यंत कमी आणि वेगवेगळ्या अडचणी आणि समस्या यांच्यासहित आरक्षण दिले जाते. तर या सिद्धांताच्या या आधारे तयार केलेल्या प्रावधानाला / तरतुदींना न्यायपूर्ण कसे म्हणता येईल ? जिथे वाटणी अन्याय पूर्ण आहे तिथे बंधुभाव शक्य आहे का? उतारा क्र. ६.७ पासून ६.१२ मध्ये दिलेली तथ्ये हे स्पष्ट करतात की हा अन्यायपूर्ण व्यवहार फक्त ओबीसींसोबतच झाला. याचाच परिणाम म्हणून ११ मे २०१० रोजी सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायाधीश के. जी. बालकृष्णन यांनी सेवानिवृत्तीच्या एक दिवस पूर्वी ओबीसींना स्थानिक स्वराज्य संस्थांत दिले जाणा-या आरक्षणासंबंधी खटल्यात निर्णय देताना आरक्षणात ५०% ची मर्यादा लादली. कलम २४३ ड(६) आणि २४३ ट (६) नुसार ओबीसींना पर्याप्त घटनात्मक संरक्षण नसल्यामुळेच ते तसे करू शकले.

**संदर्भ सूची:**


1. Ambedkar B. R. Writings and speeches, volume 14, Op- cit, page 1320-1321.
2. Government of India, Report of the Backward Class Commission, (Mandal Commission) part-1st, volume 1, New Delhi, 1980, page (Para 10) and (para 14).
3. Government of India, Cabinet Secretariat, A report on social economic and educational status of the Muslim community of India, (Sachar committee report), New Delhi, 2006, page 213, Para 7.
4. Government of Andhra Pradesh, Report of the Backward Classes Commission, Hyderabad, 1970, page 15.
5. Government of India, Mandal Commission report, New Delhi, 1980, page 20, Para 5.17.
6. Indra Sahani versus Union of India, 1992:1992, SCC L&S, Supp- 1, page 346, para 663.
7. Government of India, (Mandal Commission) report, New Delhi, 1980, IbId. page 01.
8. Yadav K. C., Ibid. page 555-571.
9. Government of India, (Mandal Commission) report, New Delhi, 1980 Ibid. page no. 2, Para 1.11.